# जटायू ते गिधाड ते जटायू... एक प्रयत्न

जन्मा आलो घेऊन अरुणप्रभा
रोखल्या सूर्यज्वाला हाक देता बंधूप्रेमा
लढलो नरोत्तमासाठी आब राखण्या सत्याची
राततुल्य गरूडनजरेने शोधली वाट सीतेची
हं! पण ही नरमैत्री कालची झाली
नरबुद्धीने शिकार आज केली...

वृद्ध गृध्रराजाने एक मोठा उसासा टाकून समोर स्तब्ध लहान-मोठ्यांवर दुःखद नजर टाकली. दुःख बाजूला सारून सर्वांना काय घडले आणि काय घडत आहे, हे सांगण्यासाठी सुरुवात केली.

''खरेच, जिथे रामयुगात जटायू बलिदानाच्या घटना मानवाचीही प्रेरित स्थाने असावीत, तिथे आज कलुषीत मानवी मनं दाखविण्यासाठी आपल्या नावाचा वापर होताना पाहिले की मानवाला आपल्याबद्दल असणारी सद्‌भावना कुठेतरी कमी झाली अशीच शंका येते.

''त्यातच नव्वदीच्या दशकातील मानवी बुद्धीने 'नकळतपणे' केलेला संहार! डायक्लोफेनॅक, माणसांचे आणि जनावरांचे वेदनाशामक औषध. हे औषध ज्या मेलेल्या गुराच्या शरीरात असेल त्याचे मांस जर आपण खाल्ले तर तेच औषध आपल्या यकृतबिघाडाला आणि शेवटी मृत्यूला कारणीभूत ठरते. हे संशोधनाअंती आढळून येईपर्यंत भारतीय उपखंडात गेल्या फक्त दोन दशकात आपल्या Gyps जातीच्या संख्येत ९५% घट झाली. लांब चोचीची गिधाडे कडेकपारीत राहतात तर पांढऱ्या पाठीची गिधाडे उंच झाडांवर घरटी बांधून राहतात. कोकणातील काही भागात नारळाच्या झाडावर घरटी आहेत. गिधाडांच्या विष्ठेमुळे नारळाच्या झाडाच्या पिकावर परिणाम होतो. ह्यामुळे नारळबागेच्या मालकाचा अनेक वेळा ही घरटी पाडण्याकडे कल असतो. वर्षातून एकच अंडे देणे आणि सध्याची आपली ढासळती संख्या बघता मानवाला ह्या बाबतीत काही वेगळे प्रयत्न करता येणार नाहीत का?

''आपले खाद्य मेलेली गुरे! पण जिथे औद्योगिकीकरण, शहरीकरण ह्याचे वेध लागलेल्या आपल्या मित्राला गावागावांतील जिवंत गुरेच 'नकोशी' झाली आहेत, तिथे आपल्याला काय मिळणार? त्यातूनच जर कोणी गुरे राखून असेल तरी वृद्ध, आजारी गुरे खाटीकखान्याला विकण्याचे वाढते प्रमाण पाहता आमच्या मित्राला आमची कीव नाही हेच खरे.

''झालेली चूक सुधारण्यासाठी काही वेळ जाणार, पण निश्चितपणे पावले उचलली जात आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण, कॅपटीव्ह ब्रीडींग, गुरांचे डायक्लोफेनॅक बनविण्यावर, विक्रीवर, वापरावर बंदी आणि नैसर्गिक जागी असणाऱ्या घरट्यांचे स्थानिकांच्या सहभागातून संरक्षण, मोठ्या प्रमाणावर जनजागृतीचे कार्यक्रम होत आहेत. पण अधिकाधिक लोकांनी ह्यात सहभागी व्हावे आणि पुन्हा एकदा आम्हाला स्थैर्य मिळावे हीच एक अपेक्षा.''

हे सर्व धोके टाळले जाऊन गिधाडांचे व त्यांच्या घरट्यांचे संरक्षण व्हावे म्हणून सह्याद्री निसर्ग मित्र प्रत्यक्ष संरक्षण, संवर्धनाचे तसेच जनजागृतीचे उपक्रम राबवीत आहे. नारळाच्या झाडावरील घरट्याच्या संरक्षणासाठी, विविध संस्थांच्या प्रयत्नाने आता गिधाडाचे घरटे असलेल्या प्रत्येक नारळाच्या झाडासाठी राज्य सरकारतर्फे घोषित करण्यात आलेली रु. ४०० ही नुकसान भरपाई, डायक्लोफेनॅकच्या गुरांचा उपचारांसाठी होणारा वापर बंद व्हावा ह्यासाठी सह्याद्री निसर्ग मित्र पशुवैद्यक, औषध विक्रेते, शेतकरी ह्यांना कार्यशाळा, चर्चासत्रे, माहितीपट अशा विविध कार्यक्रमांमधून एकत्र आणत आहे. त्याचप्रमाणे रत्नागिरी केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनमार्फत 'गुरांच्या उपचारांसाठी डायक्लोफेनॅक मिळणार नाही' असे जाहीर करणारी पत्रके सर्व औषध विक्रेत्यांकडे लावण्यात आली आहेत. ह्या सर्व कामांमध्ये वनखात्याचाही मोलाचा सहभाग आहे.

ह्या सर्व कामाची व्याप्ती वाढविण्यासाठी 'क्रिटिकल इकोसिस्टीम पार्टनरशिप फंड' (सी.इ.पी.एफ) मधून सह्याद्री निसर्गमित्राला मदत मिळत आहे. ह्या प्रकल्पांतर्गत संपूर्ण कोकण परिसर गिधाडांसाठी सुरक्षित करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील.

'पक्षीमित्र'च्या वाचकांना आणि समस्त निसर्गप्रेमींना गिधाडांची, त्यांच्या घरट्यांची किंवा गावातील लोकांकडून मिळालेली कुठलीही माहिती कळवण्याची विनंती सह्याद्री निसर्ग मित्र करत आहेत. तसेच ह्या प्रकल्पामध्ये कार्यकर्ता म्हणून काम कारण्याची इच्छा असणाऱ्यांनीही जरूर संपर्क करावा. आमचा फोन ०२३५५-२५३०३०, ९३२४३९९३४७, आणि इ-मेल - sahyadricpn@gmail.com, Web. : www.snmcpn.org

आपल्या सर्वांचे प्रयत्न गृध्रराजाची अपेक्षा पूर्ण करील आणि परत एकदा गिधाडातील जटायू आपल्याला दिसेल, ही आस.

**– रामाशिष जोशी**
सह्याद्री निसर्ग मित्र, चिपळूण.

---


महाराष्ट्र पक्षीमित्रचे आजच

## सभासद व्हा !

एकदाच रु. ५००/- भरा व आजीवन सभासदत्व मिळवा.
आपण सभासद असाल तर अजून एक सभासद नोंदवा.

**सभासद कसे व्हाल ?**

१) डी.डी. / मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षीमित्र'' या नावे चिपळूण येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.
बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, चिपळूण शाखा.
खात्याचे नाव : महाराष्ट्र पक्षीमित्र.
बँक खाते नं. : ६००३६८१२०१७
खात्यात पैसे भरून त्वरित मेलने कळवणे तसेच सभासदत्व अर्ज भरून पोस्टाने पाठवणे अत्यावश्यक आहे.
सोबत पे-इन-स्लीपची झेरॉक्स जोडावी.